आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२९ डिसेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- देशाचं संविधान आपला दीपस्तंभ असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन
- मनोरंजन आणि आरोग्य क्षेत्रातल्या कामगिरीचा प्रधानमंत्र्यांनी केला गौरव
- भारत ऑस्ट्रेलिया आर्थिक सहकार्याची यशस्वी वाटचाल
- जागतिक रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत महिला गटाचं अजिंक्यपद कोनेरु हंपीने पटकावलं

**आणि**

- दक्षिण कोरियामधे विमान अपघातात ९६ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

देशाचं संविधान आपला दीपस्तंभ आणि मार्गदर्शक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमात देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा ११७वा भाग होता.

**होल्ड - बाईट -- मोदी...**

येत्या २६ जानेवारीला देशात राज्यघटना लागू होऊन ७५ वर्षे पूर्ण होतील, त्यानिमित्तानं देशभरात अनेक उपक्रम सुरू आहेत असं त्यांनी सांगितलं. यानिमित्तानं सुरू केलेल्या कॉन्स्टीट्यूशन सेव्हनटी फाईव्ह डॉट कॉम या संकेतस्थळाला युवा वर्गानं भेट द्यावी, नागरिकांनी राज्यघटनेची प्रास्ताविका वाचून

त्याची ध्वनीचित्रफीत या संकेतस्थळावर अपलोड करावी असं आवाहन त्यांनी केलं.

येत्या १३ जानेवारीपासून उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरु होणाऱ्या महाकुंभ मेळ्यासाठी जोरदार तयारी सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. यंदाच्या मेळाव्याला भेट देणारे जगभरातले पर्यटक आणि भाविक हे डिजिटल महाकुंभाचे साक्षीदार होतील असं ते म्हणाले. त्यादृष्टीनं डिजीटल तंत्रज्ञानाच्या उपयोगानं उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधांची माहिती त्यांनी दिली.

विशालतेप्रमाणे विविधतेतली एकता हे या महाकुंभ मेळ्याचं वैशिष्ट्य असून, हा एकतेचा महाकुंभ असल्याचं ते म्हणाले. या मेळ्याला भेट देणाऱ्या प्रत्येकानं एकतेचा संकल्प घेऊनच परत यावं, समाजातली फूट आणि द्वेषाची भावना नष्ट करण्याची शपथ घ्यावी असं आवाहन त्यांनी केलं.

यावेळी प्रधामंत्र्यांनी देशाच्या मनोरंजन क्षेत्राच्या योगदानाविषयी श्रोत्यांना सांगितलं. आपले ॲनिमेशनपट, चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिका जगभरात लोकप्रिय आहेत, त्यानून भारताच्या सर्जनशील उद्योगाची क्षमता दिसून येते असं ते म्हणाले. आपलं मनोरंजन क्षेत्र देशाच्या प्रगतीत मोठे योगदान देत असून, देशाच्या अर्थव्यवस्थेलाही नवी उंची गाठून देत आहे असं ते म्हणाले. चित्रपट आणि मनोरंजन उद्योग क्षेत्रानं आशयघन निर्मितींच्या माध्यमातून एक भारत – श्रेष्ठ भारत ही भावना मजबूत केली असल्याचं सांगत, या क्षेत्राबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

२०२४ या वर्षात आपण चित्रपटसृष्टीतल्या अनेक महान व्यक्तींची १००वी जयंती साजरी करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या क्षेत्रातल्या दिग्गज

व्यक्तिमत्वांचं जीवन म्हणजे एक प्रेरणा असल्याचं म्हणत त्यांच्या योगदानाचा गौरव त्यांनी केला. राज कपूर यांनी चित्रपटांमधून जगाला भारताच्या सॉफ्ट पॉवरची ओळख करून दिली, मोहम्मद रफी यांनी आपल्या आवाजातून प्रत्येक भावना जिवंत केली, अक्किनेनी नागेश्वर राव गारू यांनी तेलुगू सिनेमाला नव्या उंचीवर नेत भारतीय परंपरा आणि मूल्यांची उत्तम मांडणी केली, तपन सिन्हा यांनी आपल्या चित्रपटांतून सामाजिक जाणिवा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला असं त्यांनी सांगितलं.

यानिमित्तानं प्रधानमंत्र्यांनी पुढच्या वर्षी देशात पहिल्यांदाच वेव्हज् अर्थात जागतिक ध्वनी चित्र करमणूक शिखर परिषदेचं आयोजन होणार असल्याची माहिती दिली. ही शिखर परिषद भारताची सर्जनशील प्रतिभा जगासमोर मांडण्याची मोठी संधी असल्याचं ते म्हणाले.

भारताच्या पारंपरिक कलांपासून आयुर्वेदापर्यंत आणि भाषांपासून संगीतापर्यंत असंख्य गोष्टींनी संपूर्ण जगाला व्यापलं आहे प्रधानमंत्री म्हणाले. जगभरात भारतीय संस्कृतीची छाप कशी उमटली आहे, याविषयीची देशो देशीची उदाहरणंही त्यांनी आजच्या मन की बात मधून श्रोत्यांसमोर मांडली.

हिवाळ्याच्या मोसमात देशभरात खेळ आणि तंदुरुस्ती विषयक राबवल्या जात असलेल्या उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. बस्तर इथं सुरू झालेल्या बस्तर ऑलिम्पिक या अभिनव स्पर्धेची माहिती देताना ते म्हणाले की या  स्पर्धा म्हणजे विकास आणि खेळाचा संगम असून, युवा प्रतिभेचा आविष्कार आहे. खिलाडूवृत्ती ही  समाजाला जोडण्याचं एक सशक्त माध्यम असल्याचंही ते म्हणाले.

आरोग्य क्षेत्रात भारतानं मिळवलेल्या यशाचा उल्लेख करताना त्यांनी मलेरिया विरोधातल्या लढ्याची देशाची कामगिरी श्रोत्यांसमोर मांडली. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार देशात २०१५ ते २०२३ या काळात मलेरियाचे रुग्ण आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये ८० टक्के इतकी घट झाली असल्याची माहिती त्यांनी दिली. देशवासियांनी एकत्रितपणे निर्धारानं या आव्हानाचा सामना केल्यानंच हे यश मिळाल्याचं ते म्हणाले.

कर्करोगा विरोधातल्या लढाईत आयुष्मान भारत योजना मोठी भूमिका पार पाडत असून, त्यामुळे ९० टक्के रुग्णांना वेळेत उपचार मिळू लागले असल्याचंही त्यांनी सांगितलं. जगप्रसिद्ध लॅन्सेट या जगप्रसिद्ध वैद्यकीय नियतकालिकात भारतात कर्करोगावर वेळच्या वेळी उपचार होण्याची शक्यता वाढली असल्याचं नमूद केलं आहे अशी माहिती त्यांनी दिली. कर्करोग आणि त्याच्या लक्षणांप्रती जागरूकता, वेळेवर तपासणी आणि उपचारांसारखी कृती, रुग्णांसाठी सर्वतोपरी मदत उपलब्ध करून देण्याची हमी या अनुषंगानं जागरूकता, कृती आणि हमी हा कर्करोगाविरोधातल्या लढ्याचा मंत्र असल्याचं ते म्हणाले.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी देशभरात शेतकऱ्यांनी छोट्या छोट्या सामुहिक प्रयत्नांतून मिळवलेल्या यशाची उदाहरणही श्रोत्यांसमोर मांडत, छोट्या सुरुवातीमधूनच मोठं परिवर्तन शक्य असतं, आपल्याला केवळ दृढ संकल्प आणि सांघिक भावनेची गरज आहे असा संदेशही त्यांनी दिला.

नव्या वर्षात मन की बातच्या माध्यमातून आणखी प्रेरणादायी प्रयत्न सामायिक करण्याचं वचन देत, प्रधानमंत्र्यांनी सर्वांना नव्या वर्षाच्या शुभेच्छाही दिल्या.

<><><><><>

भारत ऑस्ट्रेलिया आर्थिक सहकार्य आणि व्यापार कराराला दोन वर्षं पूर्ण होत असताना, या दोन्ही देशांमध्ये परस्परसंबधातून व्यापारवृद्धी आणि आर्थिक विकास यांची यशस्वी वाटचाल सुरु असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे. या करारावर स्वाक्षरी झाल्यापासून, द्विपक्षीय व्यावसायिक व्यापारात दुप्पटीने वाढ झाली. या यशाच्या पायावर भारत-ऑस्ट्रेलिया सर्वसमावेशक आर्थिक सहकार्य कराराची वाटचाल सुरु असून त्यासाठी आतापर्यंत यासाठी १० औपचारिक फेऱ्या आणि चर्चा झाल्या आहेत असं मंत्रालयानं निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

इलेक्ट्रानिक उपकरणांवर होणारा खर्च आणि त्यांच्या वापरातून निर्माण होणारा कचरा कमी करण्यासाठी युरोपियन महासंघाने सर्व नवीन उपकरणांना समान चार्जर वापरण्याची सक्ती करणारा नियम कालपासून लागू केला. त्यामुळे नवीन स्मार्टफोन, टॅबलेट आणि कॅमेऱ्यांना सी प्रकारचा चार्जर देणं उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना बंधनकारक असणार आहे. या नियमाबाबतची माहिती महासंघाने आपल्या समाज माध्यमावर दिली आहे. त्यामुळे प्रत्येक उपकरणाला नवीन चार्जर घेण्याची गरज पडणार नसून त्याचा खर्च आणि होणारा कचरा कमी व्हायला मदत होईल, असं महासंघाने म्हटलं आहे.

<><><><><>

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने काल ११ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पक्षाचे महासचिव आणि मुख्य प्रवक्ते

ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी या उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. पुढच्या वर्षी फेब्रुवारीत होणाऱ्या या निवडणुकीसाठी एकूण २५ उमेदवार देणार असल्याची माहितीही श्रीवास्तव यांनी दिली आहे. या निवडणुकीसाठी आतापर्यंत आपने ७० तर काँग्रेसने ४७ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. भाजपाने मात्र अद्याप एकही यादी जाहीर केलेली नाही.

**<><><><>**

भारताची आघाडीची बुद्धिबळपटू कोनेरू हंपी हिनं न्यूयॉर्क इथं झालेल्या जागतिक रॅपिड आणि ब्लिट्झ अजिंक्यपद स्पर्धेत महिला गटाचं जेतेपद पटकावलं आहे. इंडोनेशियाच्या प्रतिस्पर्ध्याचा पराभव करून हंपीनं या स्पर्धेतलं आपलं दुसरं जेतेपद पटकावलं. ११ फेऱ्यांमध्ये तिनं साडेआठ गुणांची कमाई केली. ३७ वर्षांची हंपी, या स्पर्धेत दोनदा अजिंक्य ठरणारी, चीनच्या जू वेंजून हिच्यानंतरची दुसरीच बुद्धिबळपटू आहे. २०१९ मध्ये हंपीनं पहिल्यांदा या स्पर्धेत अजिंक्यपद मिळवलं होतं. पुरुषांच्या गटात रशियाच्या १८ वर्षीय वोलोदार मुर्झिन विजेता ठरला.

**<><><><>**

जागतिक बुद्धिबळ क्रमवारीतला अव्वल खेळाडू मॅग्नस कार्लसन याला फिडे वर्ल्ड रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेतून बाहेर पडावं लागलं. ड्रेसकोडचं उल्लंघन केल्याबद्दल त्याला दंड ठोठावण्यात आला आणि अपात्र ठरवण्यात आलं या निर्णयावर आपण दाद मागणार नसल्याचं गतविजेता कार्लसन याने म्हटलं आहे.

**<><><><>**

दक्षिण कोरियात प्रवासी विमानाला अपघात झाला असून त्यात आतापर्यंत ९६ जणांचा मृत्यू झाला आहे. हे विमान बँकाकहून मुआन इथे प्रवास करत होतं. या विमानात १७५ प्रवासी आणि ६ कर्मचारी होते. धावपट्टीवर उतरताना लँडिंग गिअरमध्ये बिघाड झाल्यामुळे विमान अपघातग्रस्त झाल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे. स्थानिक अग्निशमन दल, पोलीस, सुरक्षा दल आणि तटरक्षक दलाच्या मदतीने बचावकार्य सुरू असून दोन कर्मचाऱ्यांना सुखरुप बाहेर काढण्यात आलं आहे. मात्र, मृतांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. दरम्यान, मुआन आंतरराष्ट्रीय विमानतळावरची सर्व उड्डाणं रद्द करण्यात आल्याचं कोरियाच्या विमानतळ प्राधिकरणाने सांगितलं आहे.

**<><><><><>**